" स्वयंप्रकाशी  स्वरतारे" या कार्यक्रमावर दिलेली एका रसिक व्यक्तीची प्रतिक्रिया-

27 ऑगस्ट .मेसा आर्ट थिएटर  . एक नितांत रमणीय कार्यक्रम बघितला.
बघितला नसता तर आमचा तोटा झाला असता.
आठवता येतंय तसं क्रमाक्रमाने सगळ्यांचं कौतुक करण्याची इच्छा आहे . राहून गेल्यास राग मानू नये .
**....सर्वप्रथम कार्यक्रमाचे शीर्षक  " स्वयंप्रकाशी  स्वरतारे".... एक चपखल , सुंदर ,यथार्थ शीर्षक आहे . कारण सर्व कलाकारांचा मायदेश खूप दूर आहे .एका अर्थी त्यांच्या कानावर  सुरांचे ,शब्दांचे संस्कार भरभरून होत  नाहीयेत .त्यामुळे त्या सर्वांची वाटचाल ही स्वयंप्रकाशातच होत आहे . गाण्यांची निवड ,त्याबद्दलची माहिती जमवणं ,गीतकार संगीतकार यांची माहिती जमवणे , त्यानंतर शुद्ध स्वरूपात गाणी जमवणे या  अनेक अर्थाने या सगळ्यांची वाटचाल वळणावळणाची आहे .
**  उत्तम निर्दोष संहिता लेखन आहे .( डॉ. अरुंधती टेंबे) आणि तेवढीच उत्तम  निवेदनाची गुंफण ..आपली स्थानिक कलाकार -राजश्री सोमण -हिने निवेदन खूप छान केलं आहे. अगदी मुलायम आपुलकीचा  आवाज ,शुद्ध आणि स्पष्ट शब्दोच्चार आणि
भावनांचा माफक शिडकावा ..
**   प्रकाश योजना आणि ध्वनी संयोजन एकदम परफेक्ट .चूक काढायला जागा नव्हती . मला कल्पना आहे की आता तंत्रज्ञान खूप प्रगत झालं आहे .पण तरीसुद्धा या पाठीमागे खूप मेहनत लागते .
महाराष्ट्रातील कलाकारांचे जमवलेले फोटो ,त्यांच्या ध्वनीचित्रफिती या पूर्णपणे निर्दोष स्थितीत आमच्यापुढे सादर झाल्या . गोष्ट साधी असते पण ती भातातल्या खड्यासारखी त्रास देते .
**   आपली स्थानिक नृत्यांगना.. बापरे !तिने किती तऱ्हेने आपली नृत्यकला पेश केली !या सगळ्यावर चेरी ऑन द टॉप सारखा शेवटचा नृत्याचा आविष्कार वाटला .कुठून या मुलीने एवढे कपडे ,एवढे तऱ्हेचे दागिने जमवले ... गाण्यांच्या अर्थानुरूप बदलणारे  तीच्या चेहऱ्यावरील हावभाव तीचे अभिनय कौशल्य ही दाखवून देत होते . पदन्यासावर तिची मजबूत पकड असल्यामुळेच तिला  डोळ्यांच्या व चेहऱ्याच्या अभिनयाकडे एवढे लक्ष देता आले .
** गाण्याच्या अर्थानुसार आणि प्रकृतीनुसार सर्व गायक गायिका इतक्या  उत्साहाने स्वतः सजत  होते की त्यांचे  खूप कौतुक वाटले . सर्वांचेच हे सजणे अगदी साजेसे आणि उच्च अभिरुचीचे होते .
** तिन्ही वादक कलाकारांनी अतिशय उत्तम आणि मोलाची साथ दिली .त्यामुळेच गाण्यांची आणि एकंदर कार्यक्रमाची  उंची खूप वाढली .
** आणि आता  महत्त्वाचे... सर्व गायक गायिका . एवढ्या खंडप्राय अमेरिकेतून हे सर्वजण , इंटरनेट द्वारे गोळा झाले कधी , त्यांना एकमेकांचा ठावठिकाणा कळला कसा , त्यांनी प्रॅक्टिस केली कशी ,कधी ...? माझी तर तोंडातच बोटे गेली आहेत .
मला कल्पना आहे की ,अमेरिकेत पाच दिवस सर्वजण जीवतोड मेहनत करून आपली करिअर सांभाळत असतात .हे सर्व करून प्रत्येक जण आपण स्वतः शिकतच आहेत . त्याशिवाय काहींचे अध्ययनाचे

कामही चालू आहे .आणि या सगळ्याला आणखीन एक चौथा कोन आहे ; तो म्हणजे प्रॅक्टिस करून अमेरिकेतल्या वेगवेगळ्या शहरात कार्यक्रम करणे....तुम्हाला सलाम !

सर्वच कलाकार तालासुराला पक्के होते .आवाजही सगळ्यांचे खूप सुंदर लागले होते .तिन्ही सप्तकात सर्वांचे आवाज छान फिरत होते आणि आम्हाला आनंदाची मेजवानीच मिळत गेली .

गाण्यांच्या केलेल्या निवडीबद्दल विशेष उल्लेख केला पाहिजे .नाहीतर मराठी गाण्यांची मैफल म्हटली की 60 65 वर्षांपूर्वीपासूनची गाणी ( जी अवीट आहेतच पण आता खूप ऐकून झाली आहेत ) ऐकवली जातात . या कार्यक्रमात प्रामुख्याने गेल्या वीस वर्षातली गाणी ऐकवली गेली .सर्व संगीतकार हे खूप उदयोन्मुख आहेत .या गीतकार आणि संगीतकारांनी आपापला जमेल तसा ठसा मराठी चित्रपटसृष्टी वर उठवला आहे .आपण त्यांना अत्यंत यथार्थ न्याय दिला आहे .

** भाग्यश्री ने अत्यंत थोडक्यात पण भावपूर्ण निवेदनाने सगळ्याचा आढावा घेतला .एका उदात्त हेतूने हा कार्यक्रम संपन्न झाला .आपला खारीचा वाटा त्यात आम्हाला उचलता आला हे समाधान ! पण अडीच तासाच्या या मैफिलीने आमची ओंजळ ओसंडून वहात आहे . तृप्त मनाने आणि तृप्त हृदयाने आम्ही घरी परतलो .

त्रिवार धन्यवाद.

-मधुरा बापट
( a visiting parent )